Shivaji College of Art's Hingoli

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - X Issue - I January - March - 2021

MARATHI PART - I

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | जगद्गुरु संत सेवालाल महाराज - एक समाजसुधारक<br>**डॉ. बालासाहेब शिवाजी पवार** | १-४ |
| २ | तथागत बुद्ध व संत साहित्य सहसंबंध<br>**प्रा. बनसोडे जी. एस.** | ५-११ |
| ३ | भक्तीसंप्रदायाचा तौलनिक अभ्यास : वारकरी संप्रदायाच्या अनुषंगाने<br>**डॉ. भरत भिमराव जाधव** | १२-१८ |
| ४ | संत तुकारामांच्या अभंगातील विठ्ठल भक्ती<br>**प्रा. डॉ. दिलीप रामचंद्र जाधव** | १९-२१ |
| ५ | महाराष्ट्रातील वारकरी परपंरेतील स्त्री संत बहिणाबाई<br>**डॉ. धनंजय नागोराव मोगले** | २२-२५ |
| ६ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील मानवतावादी विचार<br>**प्रा. डॉ. हिरालाल सोमा पाटील** | २६-३० |
| ७ | संत साहित्यातील जीवन मूल्य<br>**प्रा. डॉ. काळे. बी. एम.** | ३१-३५ |
| ८ | संत एकनाथ आणि पर्यावरण<br>**प्रा. डॉ. म. ई. तंगावार** | ३६-३९ |
| ९ | संत तुकारामांच्या अभंगातील विद्रोही भावनेचा अनुबंध<br>**प्रा. मधुकर रामचंद्र काळबागे**<br>**प्रा. सुखदेव विष्णू कोल्हे** | ४०-४३ |
| १० | संत चळवळ आणि समाजक्रांती<br>**प्रा. महेश स्वा. तानवडे**<br>**प्रा. सविता मल्लाडे** | ४४-४७ |
| ११ | संत तुकाराम यांच्या साहित्यातील विद्रोही विचार<br>**प्रा. डॉ. मारोती बालासाहेब भोसले** | ४८-५२ |


Shivaji College of ... Hingoli

VOLUME - X, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

Shivaji College of Arts, Hingoli

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२ | संत जनाबाईचे भक्ती विचार<br>**डॉ. मीना चंद्रभान साळे** | ५३-५६ |
| १३ | संत साहित्यातील भक्ती विचार<br>**प्रा. नवाजी गेंदलाल घरत** | ५७-६० |
| १४ | संत साहित्यातील लोकशिक्षण<br>**प्रा. डॉ. प्रशांत लगडे** | ६१-६६ |
| १५ | आदिवासी संत आपश्री गुला महाराज<br>**प्रा. डॉ. राजविरेन्द्रसिंग रुबजी गावित** | ६७-७२ |
| १६ | संतांचे समाजप्रबोधन<br>**डॉ. राखी मंगेश जाधव** | ७३-७८ |
| १७ | वारकरी संतांच्या कवितेतील शेती<br>**प्रा. एस. एफ. खडके** | ७९-८३ |
| १८ | वारकरी संतांच्या अभंगातील जीवनमूल्य<br>**डॉ. संभाजी शिवाजीराव जाधव** | ८४-८६ |
| १९ | संत साहित्यातील लोकशिक्षण<br>**प्रा. डॉ. संगीता नारायणराव मुंढे** | ८७-९२ |
| २० | संत नामदेव : एक अवलोकन<br>**डॉ. संजय प्रकाश बालाघाटे** | ९३-९५ |
| २१ | संत साहित्यातील भक्ती विचार<br>**प्रा. डॉ. संतोष चंपती हंकारे** | ९६-१०० |
| २२ | संत तुकारामांच्या अभंगातील मानवतावाद<br>**डॉ. शकुंतला एम. भारंबे** | १०१-१०५ |
| २३ | संत विठाबाई - विद्रोहाची ठिंगारी<br>**डॉ. भारत विठ्ठलराव शिंदे** | १०६-११० |
| २४ | संत साहित्यातील लोकशिक्षण<br>**डॉ. स्नेहल संजय मराठे** | १११-११४ |

Shivaji College of Art's Hingoli

# १९. संत साहित्यातील लोकशिक्षण

प्रा. डॉ. संगीता नारायणराव मुंढे
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

**प्रस्तावना**

लोकशिक्षण हे लोकचळवळीचे मुख्य साधन आहे. समाजाला विशिष्ट दिशा देण्यासाठी, नैतिक ,सामाजिक मूल्याच्या रूजवणूकीसाठी लोकशिक्षणाची गरज प्रत्येक कालखंडात असते. त्या त्या काळातील सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक परिस्थितीनुसार लोकशिक्षणाचं स्वरूप हे बदलत असतं. अगदी प्राचीन काळापासून लोकशिक्षणाचं हे कार्य चालत आलेले आहे. कीर्तन, प्रवचन, लोकसाहित्य ही प्राचीन काळात लोकशिक्षणाची प्रभावी अशी प्रसार माध्यमं होती असं म्हणावं लागेल. आजच्या काळातही आधुनिक प्रसार माध्यमांच्या साहाय्याने लोकशिक्षणाचं कार्य होतच आहे. साहित्य हे समाजाचं प्रतिबिंब मानल्या जातं. त्या त्या काळातील साहित्यात तत्कालीन घडामोडीचं प्रतिबिंब पडलेलं असतं. लोकशिक्षणाच्या दृष्टीनं साहित्याकडं पाहिल्यानंतर आपल्या असं लक्षात येतं की, साहित्याचा लोकशिक्षणासाठी वापर हा अगदी प्राचीन काळापासून झालेला आहे. संतानी प्रामुख्याने साहित्याचा उपयोग लोकशिक्षणासाठी केला.

मध्ययगीन काळात साहित्यनिर्मिती ही प्रामुख्याने पंथीय प्रेरणेतून झालेली आहे. नाथ, महानुभाव, वारकरी, रामदासी, दत्त, सुफी, विरशैव असे अनेक संप्रदाय त्या त्या काळाच्या संदर्भात उदयास आले. या पाठीमागे त्यांची विशिष्ट अशी विचारधारा होती, तत्त्वज्ञान होतं. त्या त्या काळाची ती गरज होती. पंथीय प्रेरणा हे प्रत्येक संप्रदायाच्या साहित्यनिर्मितीमागचं एक कारण असलं तरी मुख्य उद्देश हा लोकशिक्षण किंवा लोकोद्धार हाच होता. मध्ययुगीन काळात उद्यास आलेला व आजही आपले अस्तित्व मोठया प्रमाणावर टिकवून असलेला सर्वसमावेशक संप्रदाय म्हणजे वारकरी संप्रदाय. यालाच संत संप्रदाय किंवा भक्ती संप्रदाय असेही म्हणतात. वारकरी संप्रदायाचं तत्त्वज्ञान हे मानवता धर्मावर आधारलेलं आहे. सामाण्य माणूस हा त्यांच्या तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू आहे. संसार करून परमार्थ करता येतो, परमेश्वराच्या प्राप्तीसाठी घरदार सोडून कुठेही जायची गरज नाही हे संत संप्रदायाने सांगितले. त्यामुळे आपोआपच देवळांचे महत्त्व कमी झाले. जत्रा, यात्रा, व्रते, उद्यापने यांचे महत्त्व आपोआपच कमी झाले. लोकसंग्रह करण्यावर सगळयाच संताचा भर होता. आचार शुदधीवर भर होता. कोणाही सामान्य माणसाला आपल्या उत्कट भक्तीच्या बळावर परमेश्वराची प्राप्ती करून घेता येते हा आत्मविश्वास संत संप्रदायाने दिला. जाती पातीची बंधनं संत संप्रदायाचे नाकारली. त्यामुळे भक्तीच्या एका धाग्यात समाजातील अठरा पगड जाती बांधल्या गेल्या. केवळ भक्तीच्या बळावर आपली आत्मोन्नती करून घेता येते हे समजल्यामुळे समाजातील तळागाळातील लोकं या संप्रदायात सहभागी झाले. महाराष्ट्रातील खेडोपाडयापर्यंत हा संप्रदाय चांगलाच रूजला व महाराष्ट्राच्या पडत्या काळातही टिकून राहिला. संत ज्ञानेश्वरांच्या आधी देखील संत संप्रदाय अस्तित्वात होता, मात्र संत ज्ञानेश्वरांनी या संप्रदायाला तात्त्वीक अधिष्ठान मिळवून दिले. तो सर्वमान्य केला. संत ज्ञानेश्वरांची या संप्रदायाच्या बाबतीत भूमिका पुढील प्रमाणे होती,

Shivaji College of Art's Hingoli

"जे जे भेटे भूत ते ते मानिजे भगवंत

हा भक्तीयोग निश्चि जाण माझा."

यातून या संप्रदायाची मानवतावादी भूमिका दिसून येते. प्रत्येक प्राणीमाजाच्या ठिकाणी ते इश्वराचे रूप पहायला सांगतात. समानतेचे तत्त्व यातून दिसून येते.

मध्ययुगिन काळात निर्माण झालेल्या वेगवेगळया संप्रदायाच्या साहित्य निर्मिती मागील प्रेरणा ही पंथप्रसार, पंथनिष्ठा असली तरी लोकशिक्षण हेच त्यांच्या रचनेचे मुख्य उद्दीष्ट असल्याचे दिसते. संत ज्ञानेश्वरांनी संत संप्रदायाची पायाभरणी जेंव्हा महाराष्ट्रात केली त्यावेळची सामाजिक परिस्थिती पाहता त्यांची भूमिका लक्षात येते. बाराव्या शतकात महाराष्ट्रात अनेक पंथ, संप्रदाय निर्माण झाले होते. खरा धर्म, खरे तत्त्वज्ञान कोणालाच माहित नव्हते. नको त्या स्थानिक देवदेवतांचे स्तोम मोठया प्रमाणावर माजले होते. वैदिक धर्माचे तत्त्वज्ञान संस्कृत भाषेत बंदिस्थ होते. संस्कृत शिकण्याचा अधिकार सामान्य माणसाला नव्हता. समाज नको त्या कर्मकांडात अडकला होता. सर्व समाजाला यातून सोडवण्यासाठी ज्ञानेश्वरांनी भक्ती मुक्तीची सोपी वाट निवडली. त्यांनी भागवत धर्माचे तत्त्वज्ञान सामान्याच्या मराठी भाषेतून सांगितले. त्यामुळे संपूर्ण समाजाशी त्यांचे नाते जुळले. यातूनच पुढे मराठी संतांची एक परंपरा निर्माण झाली. ज्ञानेश्वरांच्या एकूण साहित्याचा दद्देश हा मानवी कल्याण हाच होता.

"आता विश्वात्मके देवे येणे वाग्यज्ञे

तोषावे तोषूनी मज दयावे पसायदान हे"

अशी त्यांची विश्वकल्यानाची भूमिका आहे. डॉ. मनोज तावडे म्हणतात,"महानुभाव आपल्या वाटेने गेले. वारकऱ्यानी विठ्ठल प्रमाण ठेवून त्याचे 'चरित्र' आणि 'चारित्र्य' घडविले. दोन्ही संप्रदायांचा उद्देश हा वैदिक तत्त्वज्ञान, यज्ञयाग, उपासना पदधती आणि त्यायोगे होणारे समाजाचे शारीरिक, मानसिक, आणि प्रामुख्याने नैतिक खच्चीकरण रोखणे हेच होते. काळाच्या पटलावर हे संप्रदाय भिन्न दिसत असले तरी साध्य आणि साधन एकच होते. साध्य होते 'कर्मकांडापासून सुटका' आणि साधन होते 'श्रीकृष्ण म्हणजे विठ्ठल'."[1] म्हणजे महानुभाव संप्रदाय व वारकरी संप्रदायाचा दद्देश हा लोकशिक्षण व लोकोद्धार हाच होता.

संत ज्ञानेश्वरा नंतरचे संत संप्रदायातील महत्वाचे संत म्हणजे संत नामदेव. संत नामदेवांनी आपल्या अभंग रचनेमागील भूमिका विशद केली आहे. ते म्हणतात,

"नाचू कीर्तनाचे रंगी

ज्ञानदीप लावू जगी."

भरकटलेल्या समाजाला एकत्रीत आणण्यासाठी, खरे ज्ञान सांण्याची आवश्यक्ता होती ती या संतानी पूर्ण केली. संत नामदेवांनी संपूर्ण महाराट्र भिरून पाहिला ते अगदी पंजाबपर्यंत जावून आले. कीर्तणाच्या, प्रवचनाच्या व भक्तीच्या माध्यमातून ज्ञान दानाचे कार्य त्यांनी अखंड चालू ठेवले. संत संप्रदाय तळागाळापर्यंत नेऊन पोहोचंवला. नामदेव हे सर्वसामान्याचे प्रतिनिधी होते. संसार करूनही परमार्थ साधता येतो हे त्यांनी स्वतः दाखवून दिले. त्यामुळे त्यांना लोकांचा पाठिबां मोठया प्रमाणावर मिळाला. महाराष्ट्रात संतांची एक अखंड परंपरा निर्माण झाली. आणि या परंपरेने मराठी साहित्याची परंपरा निर्माण केली. भुजंग वाडीकर व जीवन पिंपळवाडीकर नामदेवाविषयी म्हणतात,"नामदेवांच्या कीर्तनाचे, प्रवचनाचे, भक्तीचे पडसाद समाजाच्या सर्व स्थरात उमटले आणि त्यातून

Shivaji College ... Hingoli



आत्माविष्कारांची एक प्रचंड लाट उसळली. नामदेवांच्या भक्तीच्या हाकेचे निनाद सामान्य जनात आत्माविष्काराची, भक्तीची व मुक्तीची वाट कोणालाही चालता येते असा आत्मविश्वास प्रेरीत करणारे ठरले."[2] म्हणूनच संत नामदेवांना पंथ संघटक म्हणून ओळखले जाते. भागवत संप्रदाय तळागाळात रूजवण्याचे, वाढवण्याचे काम त्यांनी केले. समाजामध्ये खऱ्या अर्थाने अध्यात्मीक लोकशाही आणण्याचे काम त्यांनी केले. गोरा कुंभार, नरहरी सोनार, सावता माळी, चोखामेळा, कर्ममेळा, कान्होपात्रा, जनाबाई, परिसा भागवत, सैना न्हावी ई. कीतीतरी खालच्या समजल्या जाणाऱ्या जातीतिल व्यक्ती संतत्वाला पोहोचंल्या हे केवळ नामदेवांच्या कार्यामुळे.

संत एकनाथांना लोकशिक्षक म्हणून ओळखले जाते. संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव कालीन परिस्थितीपेक्षा संत एकनाथांच्या काळातील परिस्थिती ही वेगळी होती. राजकीय सत्ता ही परकीय होती. हिंदू धर्म टिकतो की नाही अशी परिस्थिती निर्माण झाली होती. समाजात अंधःश्रद्धा बुवाबाजी मोठया प्रमाणावर माजली होती. या परिस्थितीच्या संदर्भात संत एकनाथांनी समाजजागृती करण्यासाठी वेगवेगळया वाङ्मय प्रकारातून लेखन केले. त्यांच्या साहित्याचे वेगळेपण पाहिल्यानंतर त्यांची भूमिका लक्षात येते. समाजातील वेगवेगळया वर्गातील लोकांसाठी त्यांनी रचनेचे वेगवेगळे प्रकार हाताळले. त्यामुळे समाजातील सर्वच स्थरापर्यंत त्यांचे विचार पोहोचंले. त्यांना समाजात आध्यात्मिक समता निर्माण करावयाची होती. समाजाला आत्मविश्वास देण्याचे काम त्यांनी केले. अभंग, पदे, गौळणी, भारूडे यांच्या माध्यमातून ते समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत जावून पोहोचंले. स्वतःचे माणूसपण विसरलेल्या समाजाच्या घटकाला नाथांनी जवळ केले. महाराष्ट्राच्या लोकपरंपरा लोकशिक्षणातून त्यांनी समृद्ध केल्या. कितीतरी रूपकाच्या माध्यमातून नाथांनी समाजाला जागे केले. त्यामुळेच समाजघटकातील प्रत्येक व्यक्तिीला ते आपलेसे वाटतात. डॉ. सतीश बडवे संत एकनाथाविषयी म्हणतात, "मराठीतील जेष्ठ संत आणि समन्वयकार म्हणून एकनाथांचे कार्य मौलिक स्वरूपाचे आहे. मराठी लेखनाच्या परंपरेला व मराठी कवितेला नाथांनी दिलेले योगदान लेखन परंपरा अधिक बळकट करणारे आहे."[3] यातून आपल्याला नाथांचे साहित्य कसे सर्वसमावेशक होते हे समजते.

मध्ययुगीन काळात संत एकनाथानंतर होवून गेलेले महत्त्वाचे संत म्हणजे संत तुकाराम. अतिशय धर्मग्लांनीच्या काळात संत तुकारामांनी आपल्या कार्य कतृत्वाने समाजाला एक दिशा दिली. समाजाचा कोंडलेला प्रवाह मोकळा केला. गृहस्थ तुकाराम ते साक्षात्कारी संत असा तुकारामांच्या आयुष्याचा प्रवास आहे. त्यांचे चरित्र सामान्य माणसाला तुकाराम आपलेसे करायला पुरेसे आहे. अनंत अडचणीतून वाट काढत स्वतःची आध्यात्मीक प्रगती तुकारामांनी करून घेतली. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकाला ते आपलेसे वाटतात. आपल्याला आलेले अनुभव व झालेले ज्ञान ते रोखठोकपणे अभंगाच्या माध्यमातून सांगतात. त्यांची भूमिका ही उपदेशकाची आहे.

"जे जे आपणाशी ठावे ते ते सकळासी शिकवावे
शहाणे करूण सोडावे सकळ जण."

असी त्यांची अभंग रचनेमागची भूमिका आहे. तुकारामांच्या रचनेत सामाजिक समतेचा पुनः पुन्हाः उद्घोष आहे. जातिप्रथा, बुवाबाजी, अंधःश्रद्धा याबद्दल तिव्र शब्दात ते निषेध व्यक्त करतात. दगडात देव शोधण्याचा वेडेपणा त्यांना मान्य नाही. 'भूती भंगवंत हा तो जाण तो संकेत' असे ते म्हणतात. जत्रा, यात्रा, जप, तप, बुवाबाजी यातच खितपत पडलेल्या समाजाला तुकारामांनी परमेश्वर कशात आहे हे सांगितले. ते म्हणतात,

Shivaji College of Art's Hingoli

"जे का रंजले गांजले त्यांसि म्हणे जो आपुले
तोचि साधू ओळखावा देव तेथेचि जाणावा"

यातून मानवता धर्माची शिकवण त्यांनी दिली आहे. तसेच ते म्हणतात,

"साधु संत येती घरा
तोची दिवाळी दसरा."

सद्‌वर्तन, साधुसंतांची संगत याला जीवनात महत्त्व दयायला सांगतात. साधुसंतांच्या संगतीने जीवन कसे आनंददायी होते. हे त्यांनी सांगितले आहे. तुकारामांची वाणी ही रोखठोक आहे. जे जे न पटणारे आहे, समाजविघातक आहे तिथे ते स्पष्ट शब्दात बोलतात.

उदाः "देव्हाऱ्यावर विंचु आला. देवपूजा नावडे त्याला
तेथ पैंजाराचं काम अधमासी तो अधम.
पाया जाला नारू तेथ बांधला कापरू
तेथ बिंबव्याचे काम अधमासी तो अधम."

म्हणजे ज्या माणसाला सरळ सांगून समजत नाही किंवा कोणी देवाच्या नावावर दुसऱ्याला लुबाडण्याचे काम करतात. त्यांना त्यांच्याच भाषेत सांगावे लागते. तुकारामांची ही शिकवण आजच्या काळातही तेवढीच उद्‌बोधक आहे. तुकारामांचे अंभग हे नैतीक मूल्याची शिकवण देणारे अक्षर वाङ्मय आहे. त्यांच्या अभंगाना सुभाषीताचे मौल प्राप्त झाले आहे.

उदाः 'नाही निर्मळ मन काय करील साबन'
'महापुरे झाडे जाती तेथ लव्हाळे वाचती'
'लहानपण दे गा देवा मुंगी साखरेचा रवा'
'नाही निर्मळ मन काय करील साबन'
'निंदकाचे घर असावे शेजारी'
'वृक्षवल्ली आम्हा सोयरी'
'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले'

हे अनुभवजन्य ज्ञान कोणत्याही काळात तेवढेच उपयोगी आहे. भुजंग वाडीकर व जीवन पिंपळवाडीकर त्यांच्याविषयी म्हणतात,"आम्ही वैकुंठवासी आलो यांची कारणाशी" या एकाच उदात्त व्यापक भूमिकेतून सामाजिक प्रगतीत अवरोध बनून ठाकणाऱ्या समाजविघातक दुष्प्रवृत्तींचा तुकोबांनी केकेला मुकाबला पाहतांना त्याच्यातील द्रष्टया व कर्त्या लोकशिक्षकाचे दर्शन घडते."[4]

"बुडती हे जन न देखवे डोळा

म्हणूनी कळवळा येत असे" ही त्यांच्या अंभग रचनेमागची भूमिका आहे. समाजाविषयी वाटणारी तळमळ यातून दिसून येते. आजूबाजूला सगळीकडे अनाचार, अनिती माजलेली असतांना तुकारामांना गप्प बसवत नाही. समाजाच्या अत्यंतिक कळवळयातून त्यांची ही अभंगवाणी जन्म घेते. म्हणूनच ती लोकांच्या ऱ्हदयावर कोरली आहे.

Shivaji College of Arts... Hingoli

तेराव्या शतकापासून ते अठराव्या शतकापर्यंत महाराष्ट्रात संत परंपरा आणि या परंपरेने निर्माण केलेले साहित्य मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेले दिसते. या परंपरेतील शेवटचे प्रभावी संत म्हणजे संत रामदास हे होत. खरं तर रामदासांनी आपल्या विचार प्रसारासाठी वेगळया अशा रामदासी संप्रदायाची स्थापना केली. मात्र ते त्या काळाच्या संदर्भात त्यांना करणे गरजेचे होते. त्यांचे धेय हे आधीच्या संताप्रमाणेच लोकोद्धार हेच होते. महानुभाव आणि वारकरी संप्रदायाचा समन्वय रामदासात झालेला पाहायला मिळतो. ते इहवादी, पंवृत्तीवादी भूमिका मांडतात. त्यांची भूमिका ही लोकशिक्षकाचीच आहे. प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय ते साधतात. भुजंग वाडीकर व जीवन पिंपळवाडीकर संत रामदासाविषयी म्हणतात, "समाजाचे हरवलेले समाजपण साधावे या जाणिवेने प्रयत्नरत राहणरा एक कर्ता संत म्हणून रामदास विख्यात आहेत. त्यांच्या साहित्याच्या मुळाशी ही समाजहिताची तळमळ आहे. त्यांची स्फूट स्वरूपाची रचना याच सजगतेतून झालेली आहे."[5] संत रामदासांनी मोठया प्रमाणावर लिखान केले. त्यात मोठया प्रमाणावर वैविध्य होते. करूनाष्टके सोडली तर रामदासांची साहित्य लिखानापाठिमागची भूमिका ही मार्गदर्शकाची आहे. ते म्हणतात,

"मुलाचे चालीने चालावे मुलाच्या मनोगते बोलावे
तैसे जनांसि शिकवावे हळूहळू"

या पद्धतीने लोकांना जर शिकवले तर ते निश्चित शिकतील. रामदासांची भूमिका ही उपदेशकाची आहे. त्यांचे 'मनाचे श्लोक' म्हणजे तर एक आदर्श अशी वागण्याची आचार संहिताच आहे असे म्हणावे लागेल.

उदा: "जो दुसऱ्यावरी विश्वासला त्याचा कार्यभाग बुडाला
जो आपणचि कष्टत गेला तोचि भला."

स्व कतृत्वावरचा विश्वास संत रामदासांनी व्यक्त केला आहे. सामान्य माणसाला कृतीप्रवन करण्याचे काम ते करतात.

संत पंरपंरा ही खुप मोठी आहे. संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास हे पाच प्रमुख संत म्हणून ओळखले जातात. एकूण संत परंपरेची विचारधारा ही या प्रमुख संताच्या विचारधारेवरच आधारलेली आहे. म्हणून संत साहित्यातील लोकशिक्षण समजून धेण्ययसाठी या प्रमुख पाच संतांचा विचार ईथे केला गेला आहे. मानवी जगण्याला उन्नत करणारा विचार संतानी दिला. सामान्य माणसाला आत्मसन्मानाने जगता आले पाहिजे यासाठी सर्वच संतानी प्रयत्न केले आहेत. संत साहित्यामध्ये नैतिकतेला विशेष प्राधान्य होतं. नैतिक मुल्य समाजामध्ये रूजावित म्हणून त्यांनी आपल्या साहित्यातून ती वारंवार सांगितलेली दिसतात. प्रपंच करत करत परमार्थ साधता येतो हे त्यांनी दाखवून दिले. समाजाला एकसंध ठेवण्याचे आपली भाषा, संस्कृती टिकवून ठेवण्याचे काम संतांनी केले. सध्याच्या काळात संत विचाराची आवश्यक्ता आहे.

**निष्कर्ष**

1. लोकोद्धार हीच संत साहित्यापाठीमागची भूमिका आहे.
2. सामान्य माणसाला आत्मसन्मान मिळवून देण्याचे काम संत साहित्याने केले.
3. मानवी मूल्याची रूजवणूक संत साहित्याने केली.
4. संध्याच्या अथेर्याच्या, नैतिक अधःपतनाच्या काळात समाजाला दिशा देण्यासाठी व मानवी मूल्य रूजवण्यासाठी संत विचाराची आवश्यक्ता आहे

संदर्भ

1. डॉ. [illegible]ायडे मनोज–साहित्य आणि विद्रोह, संपा–प्रा.पृथ्वीराज तौर, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.प्र.आ. 2008 पृ.[illegible]3
2. संपा. प्रा.वाडीकर भु.द., डॉ.पिंपळवाडकर जीवन– प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, अभय प्रकाशन नांदेड. प्र.आ.1996 पृ. 65
3. डॉ. बडवे सतिश– मध्ययुगीन साहित्याविषयी, मीरा बुक अँड पब्लिकेशन,औरंगाबाद. प्र.आ.2010 पृ.59
4. संपा. प्रा.वाडीकर भु.द., डॉ.पिंपळवाडकर जीवन– प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, अभय प्रकाशन नांदेड. प्र.आ.1996 पृ. 113
5. उ.नि.पृ.134

Shivaji College of Arts Hingoli